जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

म.बा.क.अंतर्गत बालवाडी विभाग

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

महिला व बालकल्याण विभागांतर्गत कार्यरत बालवाडी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र बालकांना / विद्यार्थ्यांना स्वयंपाक गृहामार्फत शासनाने विहित केलेल्या दरात शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्याकरिता पात्र संस्थांकडून अर्ज मागविणे.

कार्यक्रमाचा कालावधी २०२६-२७ करीता शासनाच्या निर्देशानुसार पूर्व - प्राथमिक बालकांसाठी सकस आहाराचा पुरवठा करणे बाबत

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

सरदार वल्लभभाई पटेल टॉवर, प्रशासकीय इमारत,

महात्मा गांधी रोड, नेहरूचौक, जळगाव – ४२५००१ (महाराष्ट्र राज्य)

फोन क्र.(०२५७) २२२२२६१, ६२, ६३, ६४, ६५

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

कार्यालयाचा पत्ता : सरदार वल्लभभाई पटेल टॉवर, प्रशासकीय इमारत,
महात्मा गांधी रोड, नेहरू चौक, जळगाव - ४२५००१

महिला व बालकल्याण विभागांतर्गत कार्यरत बालवाडी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र बालकांना / विद्यार्थ्यांना स्वयंपाक गृहामार्फत शासनाने विहित केलेल्या दरात शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्याकरिता पात्र संस्थांकडून अर्ज मागविणे.

अ. क्र.	**कामाचेनाव**
०१	महिला व बालकल्याण विभागांतर्गत कार्यरत बालवाडी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र बालकांना / विद्यार्थ्यांना स्वयंपाक गृहामार्फत शासनाने विहित केलेल्या दरात शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्याकरिता पात्र संस्थांकडून अर्ज मागविणे.

उपरोक्त बाबतची संपूर्ण माहिती www.jcmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कार्यक्रमाचे वेळापत्रक

उपक्रम	**दिनांक व वेळ**
स्वारस्य अभिव्यक्ती (**EOI**) प्रसिद्धी	दि.१६/११/२०२६ रोजी सायं.५ वाजल्या पासून
निविदा पूर्व बैठक (**Pre Beed Meeting**)	दि.२३/११/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा.
स्वारस्य अभिव्यक्ती (**EOI**) कागदपत्रे सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ	दि.३०/११/२०२६ रोजी सायं.५ वाजेपर्यंत
पात्र संस्थांचे सादरीकरण	स्वतंत्र पणे कळविण्यात येईल.
पात्र संस्थेची निवड व घोषणा	स्वतंत्र पणे कळविण्यात येईल.

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

महिला व बालकल्याण विभाग

जळगाव शहरातील नागरी भागातील बालवाडीमध्ये तयार आहाराचा पुरवठा करण्यासंदर्भात

पात्र संस्थांकडूनExpression Of Interest अर्ज

मा.आयुक्तसो., जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव बालवाडी विभागाकरिता बचतगट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थांकडून किंवा ज्यांनी सदर प्रकारचा तयार आहार पुरवठा शाळामध्ये शासकीय संस्थेस, वस्तीगृहासजिमखाना, खाजगी कार्यक्रम वा इ. ठिकाणी पुरविला असल्यास अशा पात्र संस्थांकडुन स्वारस्य अभिव्यक्ती (**EOI**) द्वारे जळगाव शहर महानगरपालिकेकडुन अर्ज मागविण्यात येत असून सदर अर्ज जळगाव शहर महानगरपालिका वेबसाईट www.jcmc.gov.inया संकेतस्थळावरुन खरेदी करता येईल.

स्वारस्य अभिव्यक्ती (**EOI**) दस्तऐवज / कागदपत्रे हि म.बा.क अंतर्गत असलेल्या बालवाडी विभागात मजला क्र.५, सरदार वल्लभभाई पटेल टावर ज.श.म.न. पा मुख्य प्रशासकीय इमारत. एम.जी.रोड नेहरु चौक जळगाव येथे कार्यालयीन वेळेत शासकीय सुटीचे दिवस वगळून सादर करावेत.

१.कामाचे स्वरुप :-

१.१ शालेय पोषण आहार या योजनेअंतर्गत बालवाडी वर्गातील विद्यार्थ्यांना ४०० ते ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त सकस आहार पुरविण्यात येते.

१.२ नागरी भागाकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्ती (Expression Of Interest) अर्ज प्रक्रियेतून पात्र ठरणाऱ्या व किमान ६० गुणापेक्षा जास्त गुण मिळालेल्या संस्थाना आहार वाटपाचे काम हे पारदर्शक पध्दतीने संस्थेच्या क्षमतेनुसार विभागून वाटप करण्यात येईल.

१.३ शासन निर्णय दिनांक १८ जून, २००९ व दिनांक ०२ फेब्रुवारी, २०११ मधील परिशिष्टात विहीत करण्यात आलेल्या पाक कृतीप्रमाणे तसेच, खाली नमूद केलेल्या पाककृतींपैकी आठवडयामध्ये विविध पाककृतींचा समावेश असलेला दररोज शिजवलेला ताजा व गरम आहाराचा पुरवठा संस्थेने संबंधित बालवाडींना करावयाचा आहे. या योजनेमध्ये लाभार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती शासनामार्फत आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर पाककृती मधून दिवसनिहाय पाककृती निवड करण्याचे व त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना राहतील.

अ.क्र.	पाककृती
१	डाळ तांदूळाची खिचडी (मूगडाळ)
२	भात व कडधान्याची उसळ (मटकी)
३	भात व कडधान्याची उसळ (वाटाणा)
४	वरण भात (तूरडाळ)
५	भात व कडधान्याची उसळ (हरभरा)
६	भात व कडधान्याची उसळ (चवळी)
७	पुलाव भात

१.४ आठवड्यातून एकदा नियमित आहाराव्यतिरिक्त एक दिवस पुरक आहार दि.०२ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या पदार्थांपैकी (खजूर, चिक्की, राजगीरा लाडू, फळे इ.) स्वखर्चातून देणे अनिवार्य राहील. प्रत्येक आठवडयाचा पुरक आहार प्रत्येक बुधवारी खालील नियोजनाप्रमाणे द्यावा-

१. महिन्याचा पहिला बुधवार फळे स्थानिक उपलब्धतेनुसार
२. महिन्याचा दुसरा बुधवार - शेंगदाणा लाडू /चिक्की
३. महिन्याचा तिसरा बुधवार- राजगिरा / चुरमुरा लाडू
४. महिन्याचा चौथा बुधवार- खजूर /खारीक
५. महिन्याचा पाचवा बुधवार- फळे स्थानिक उपलब्धतेनुसार जर बुधवारी शाळेला सुटी असेल तर लगतच्या शालेय दिवशी पुरक आहाराचे वाटप करण्यात यावे.

१.५ संबंधित संस्थेने अन्न शिजविताना आवश्यक असलेला भाजीपाला, कोथिंबीर, मिर्ची, टोमॅटो व इतर साहित्याचा स्वखर्चाने वापर करणे अनिवार्य राहील. अन्न शिजवण्याकरीता आवश्यक इंधन स्वखर्चाने वापरणे अनिवार्य राहील.

१.६ स्वयंपाकगृह संस्थेने स्वतःच्या स्वयंपाक गृहामध्ये अन्न शिजवायचे आहे. शिजवलेले अन्न शाळा स्तरापर्यंत वाहतूक करावयाचे आहे.

१.७ शिजवलेले अन्न हवाबंद डब्यातून आणि अन्न व औषध प्रशासनाचा अन्न वाहतूकीचा परवाना असलेल्या वाहनातून अन्नाची वाहतूक करणे अनिवार्य राहील.

१.८ स्वयंपाकगृह संस्थेस आहार पुरवठ्याच्या कामाचे कंत्राट दिल्याच्या दिनांकापासून पुढील ०१ वर्षाच्या कालावधीत शालेय कामकाज सुरुअसणाऱ्या प्रत्येक शालेय दिवशी दैनंदिन तत्वावर संस्थेने शिजवलेल्या आहाराचा पुरवठा बालवाडीतील विद्यार्थ्यांना करावयाचा आहे.

१.९ शिजवलेल्या आहाराचा पुरवठा बालवाडीत उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना करावयाचा आहे.

१.१० प्रत्येक विद्यार्थ्यासाठी संस्थेकडुन आहार आला आहे. याची परिगणना करुनबालवाडीमध्ये शिक्षण घेत असलेल्या बालकांसाठी शिजविलेल्या आहारासाठी 08 रुपयेप्रती दर याप्रमाणे रक्कम देय राहील.

२. संस्थेच्या पात्रतेबाबतचे निकष :-

२.१ ज्या स्वयंसेवी संस्थेमार्फत धर्म, जात आणि वंश या आधारे कोणताही भेदभाव करण्यात येत नाही. अशी स्वयंसेवी / अशासकीय संस्था योजनेमध्ये भाग घेण्यास पात्र राहील.

२.२ सदरहू योजनेत भाग घेणारी संस्था ही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६०, सहकारी संस्था अधिनियम १९६०, कंपनी नोंदणी कायदा, अन्वये ना नफा ना तोटा या तत्वावर नोंदणी झालेली कंपनी अथवा आस्थापना किंवा बचतगट या संस्था कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेल्या असावीत. सदर संस्थेची नोंदणी ही दि. ०१ एप्रिल २०१८ पूर्वी झालेली असणे आवश्यक आहे.

२.३ अर्ज प्रक्रियेसाठी संबंधित महानगरपालिका या ठिकाणी नोंदणीकृत बचतगट अर्ज करण्यास पात्र राहतील.

२.४ आहार पुरविण्यासाठी संस्था आर्थिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. महानगरपालिका क्षेत्रातील किमान १५०० विद्यार्थ्यांच्या १ युनिटसाठी अर्ज करणाऱ्या संस्थेची आर्थिक उलाढाल सन 2023-24 ,2024-25,2025-26 मध्ये सरासरी रु.२० लक्ष एवढी असणे आवश्यक राहील. सदर आर्थिक उलाढाल ही आहार शिजवून त्याचे वाटप करण्या संदर्भातील असणे आवश्यक आहे.

२.५. शासकीय, निमशासकीय संस्थेस अन्न शिजवून पुरवठा केल्याबाबत कामाचा अनुभव असणे संबंधित बचतगट/ संस्थेस असणे आवश्यक आहे. तसे अनुभव प्रमाणपत्र व कामाचे कार्यादेश जोडणे आवश्यक राहील.

२.६ संस्थेकडे स्वयंपाक गृहासाठी तसेच गोडाऊनसाठी महानगरपालिका क्षेत्रानुसार पुढील प्रमाणे जागा असणे आवश्यक आहे.

अ) सदर जागा संस्थेच्या मालकीची किंवा रितसर नोंदणीकृत भाडेतत्वावर घेतलेली असणे आवश्यक आहे.

ब) भाडेकरार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज करण्यापूर्वीचा असावा.

क) सदरील जागा संबंधित महानगपालिकाकार्यक्षेत्राच्या हद्दीमध्ये असणे आवश्यक आहे.

२.७ विद्यार्थी संख्येनुसार प्रति युनिट मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेने बदल केल्यास त्याप्रमाणात स्वयंपाकगृह व गोडाऊन साठीच्या आवश्यक जागेबाबत बदल करता येईल.

२.८ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार संस्थेकडे अन्न शिजविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

२.९ संस्थेकडे अन्न शिजवण्याच्या प्रक्रियेसाठी आरोग्यदृष्ट्या पात्र असलेला व कोणत्याही

संसर्गजन्य रोगापासून मुक्त असलेला पुरेसा कर्मचारी वर्ग असणे बंधनकारक आहे. शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्रत्येक कर्मचाऱ्याची आरोग्य तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही संस्थेची निवड झाल्यानंतर०१ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

२.१० शिजविलेल्या अन्नाची बालवाडी स्तरापर्यंत वाहतूक करण्याकरीतास्वतःच्या मालकीची अथवा भाडेतत्वा वरील प्रतियुनिट किमान ०१ वाहन असणे आवश्यक आहे. सदरील वाहनांना अन्न सुरक्षा वमानके अधिनियम २००६ नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे. याबाबतचे स्वयंघोषणापत्र व संबंधित वाहनांचे आर. सी. बुक आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत वाहतूकीचा परवाना संबंधित महानगरपालिका यांच्याकडे छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तयार आहाराचा पुरवठा अन्न तयार झाल्यापासून जास्तीत जास्त १ तासामध्ये बालवाडी पर्यंत पोहचणे आवश्यक राहील.

२.११ एक व्यक्ती अनेक संस्थांमध्ये पदाधिकारी असल्यास अशा प्रकरणी कोणत्याही एकाच संस्थेने अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. सदर अटीचे पालन न करणा-या संस्था निवड करण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

२.१२ सदरील संस्थेच्या विरुध्द किंवा संस्थेतील पदाधिकाऱ्याविरुध्द कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. तसेच, सदरील संस्थेचा काळया यादीत (Black) Listed) समावेश झालेला नसावा.

२.१३ अर्ज प्रक्रीयेतून संबंधित नागरी भागात पात्रठरलेल्या सर्व संस्थांना आहार वाटपाचे काम मिळण्याच्या दृष्टिने सदर काम विदयार्थी संख्येनुसार पारदर्शक पध्दतीने विभागून देण्यात येईल.

२.१४ सद्यस्थितीत संस्थेचे काम चालू अस्लेबाबतचे प्रमाणपत्र जोडने आवश्यक आहे.

३. अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्राची यादी :-

३.१ संस्थेचे पदाधिकारी व संपर्क अधिकारी यांचे नाव पदनाम, पत्ता, दूध्वनी क्रमांक इ. बाबतचा तपशील.

३.२ संस्थेच्या उपविधीची प्रत/विधान पत्राची (Memorandum of Association) ची प्रत..

३.३ संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

३.४ संस्थेचा मागील ३ वर्षातील कार्याचा अहवाल.

३.५ संस्थेस शासकीय / निमशासकीय कार्यालये, वस्तीगृहे किंवा अंगणवाड्या यांना आहार पुरवठा करण्यासंदर्भात अनुभव असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिकान्याचे प्रमाणपत्र सदर प्रमाणपत्रामध्ये अन्न पुरविल्याच्या कालावधी व अन्न पुरवठ्याचा एकुण रकमेचा व विद्यार्थी संख्येचा उल्लेख असावा.सोबत कार्यादेश जोडावेत.

३.६ अग्निसुरक्षितता प्रमाणपत्राची (Fire Safety Certificate) प्रत

३.७ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार संस्थेचा अन्न शिजविण्याचा परवाना.

३.८ शिजविलेल्या अन्नाची बालवाडी स्तरापर्यंत वाहतूक करण्याकरीतास्वतःच्या मालकीची अथवा भाडेतत्वावरीलप्रतियुनिट किमान ०१ वाहने असणे आवश्यक आहे. सदरील वाहनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम२००६ नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे. याबाबतचे स्वयंघोषणा पत्र व संबंधित वाहनांचे आर. सी. बुक व अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत वाहतूकीचा परवाना व भाडेकरार.

३.९ गुमास्ता अनुज्ञापत्राची प्रत (Shop Act License).

३.१० कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व काळ्या यादीत समावेश नसल्या-बाबतचे(Black Listed) ५०० रु. च्या स्टॅम्पपेपरवरॲफिडेव्हिट.

३.११ संस्थेचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले सन (2023-24 ,2024-25,2025-26) वर्षाचे आर्थिक ताळेबंद.

३.१२ संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी महानगरपालिका क्षेत्रानुसार आवश्यक असणाऱ्या जागेची कागदपत्रे (जागा स्वतःच्या मालकीची असल्यास किंवा नोंदणीकृतभाडेकरार/ जागा भाड्याची असल्यास) या बाबतची कागदपत्रे.

३.१३ संस्थेचा कोणताही पदाधिकारी सदर EOI अर्ज भरणाऱ्या इतर संस्थांचा पदाधिकारी नसल्याचे हमी पत्र.

४. संस्थेची निवड करण्याची कार्यपध्दती :-

४.१ मुददा क्र. २ मध्ये नमूद असलेल्या निकषानुसार तसेच मुददा क्र. ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची विहित कालावधीत छाननी करण्यात येईल. त्यानंतर कागदपत्र तपासणीमध्ये पात्र झालेल्या बचतगट/ संस्था यांच्या स्वयंपाकगृहाचीव्यवस्था उपलब्ध वाहतूक व्यवस्थेची पाहणी करून गुणांकन करण्यात येईल.

४.२ नागरी भागाकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्ती (Expression Of Interest) अर्ज प्रक्रियेतून पात्र ठरणाऱ्या व किमान ६० गुणापेक्षा जास्त गुण मिळालेल्या संस्थाना आहार वाटपाचे काम हे पारदर्शक पध्दतीने संस्थेच्या क्षमतेनुसार विभागून वाटप करण्यात येईल.

५ <u>गुणांकन तक्ता /पत्रक</u>

महानगरपालिका क्षेत्रासाठी किमान अटी पूर्ण करण्यासाठी

अ.क्रं	गुणदान निकष	
1	**आर्थिक वर्ष सन मधील सरासरी वार्षिक उलाढाल तयार अन्नाचा पुरवठा करणे संदर्भात आवश्यक)**	**कमाल गुण-20**
1.1	50 लक्ष च्या पुढील	20
1.2	46 ते 50लक्ष	18
1.3	41 ते 45 लक्ष	16
1.4	35 ते 40 लक्ष	14
1.5	35 लक्ष पेक्षा कमी	12
2	**शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्याचा अनुभव**	**कमाल गुण-20**
2.1	प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत	20
2.2	बालवाडी	18
2.3	इतर शासकीय योजना	16
2.4	शासकीय निमशासकीय कार्यालये, शाळा महाविद्यालये उपहारगृह इ.	14
2.5	इतर खाजगी उपहारगृहे, कार्यक्रम इ.	10
3	**संस्थेची वर्गवारी**	**कमाल गुण-20**
3.1	महिला संस्था अध्यक्षासह सर्व पदाधिकारी महिला असल्यास	20

3.2	अध्यक्ष महिला व इतर काही सदस्य महिला असल्यास	18
3.3	सर्वसाधारण संस्था	16
3.4	सर्वसाधारण सहकारी संस्था	14
3.5	चॅरिटेबल ट्रस्ट	12
3.6	यापैकी नाही	10
4	**स्वयंपाकगृह उभारणी**	**कमाल गुण-20**
4.1	स्वत:च्या जागेवर किचनशेड/ गोदाम आहे व स्वयंपाक गृहकार्यान्वित आहे.	20
4.2	नोंदणीकृत (दुय्यम उपनिबंधक) भाडयाच्या जागेवर किचनशेड/गोदाम उभारले आहे व स्वयंपाकगृहकार्यान्वितआहे.	16
4.3	अन्न शिजविण्यासाठी आवश्यक उपकरणासह किचनशेड गोदाम उपलब्ध आहे. परंतु स्वयंपाक गृहकार्यान्वित नाही.	10
4.4	किचनशेड/ गोदाम उपलब्ध आहेत. परंतु अन्न शिजविण्यासाठी आवश्यक उपकरणे नाहीत.	5
4.5	यापैकी नाही	0
5	**अन्न सुरक्षा व मान अधिनियम 2006 अन्वये अन्न शिजविण्याचा परवाना**	**5**
6	**वाहनास FDA अन्न वाहतूकीचा परवाना**	**5**
7	**स्वयंपाकगृहास ISO प्रमाणपत्र असल्यास**	**5**
8	**सर्व लेखे सनदी लेखापाल (Chartered Accountant) मार्फत प्रमाणित केली असल्यास**	**5**
	एकूण गुण	**100**

६. सर्वसाधारण अटी व शर्ती :-

६.१ एकात्मीकबालविकास सेवा योजना अंतर्गत राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने पारीत केलेला शासन निर्णय याचीका २०१९/प्र.क्र.५/का-५ दि.३ एप्रिल २०१९ अन्वये पोषण आहार दर रु. ८/- मात्र विहीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार (शासकीय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १५ ग्रॅमप्रथिनेयुक्त आहारासाठी प्रति बालक प्रति दिन रु. ८/- मात्रचा आहाराचा दर विहित करण्यात आलेला आहे). त्यानुसारच पुरवठादार / मक्तेदार यांनी शासननिर्णयाच्या अनुषंगाने आहाराचे दर विहीत केलेल्या दरानुसार बांधिलराहुन त्या आतील कमी दराची निश्चितीकरुननिवीदा दर भरावेत. उक्त निवीदा प्रकरणी पात्र बचतगटांचा यात प्राधान्याने विचार करण्यात येईल. पुरवठादार संस्थेस कोणत्याही प्रकारच्या वस्तू, भांडी किंवा पूरक पदार्थ शासनाकडून पुरविले जाणार नाही.

६.२ पुरवठादार संस्थेने आहाराची वाहतूक करणाऱ्या वाहनात प्रमाणित इलेक्ट्रॉनिक वजन काटा ठेवला पाहिजे व प्रत्यक्ष आहार बालवाडी व शिक्षिका /कर्मचारी वर्ग यांचेसमोर दररोज वजन करून दिला पाहिजे.

६.३ नियोजित पुरवठादार संस्थेस नेमून दिलेल्या बालवाडयामध्ये आहार पुरवठ्याचे काम करणाऱ्याकर्मचाऱ्याकडे अधिकृत ओळखपत्र असणे आवश्यक आहे. सदर कर्मचान्याची

माहिती. पुरवठादार संस्थेने महानगरपालिका येथील महिला बालकल्याणविभागाचे अधिकारी यांचेकडे देणे बंधनकारकराहील.

६.४ शासन निर्णय दिनांक १८ जून, २००९ व दिनांक ०२ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशांची/नियमांची अंमलबजावणीपुरवठादार संस्थेने करणे अनिवार्य राहील.

६.५ पुरवठादार संस्थेचे स्वयंपाकगृह, गोदाम, संस्थेतील सर्व लेखी नोंदवह्या तसेच अशा वाहनाची अधिकारी तपासणी करतील, त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना संपूर्ण सहकार्य करण्याची संस्थेची जबाबदारी राहील.

६.६ बालवाडयामध्ये शिजविलेले अन्न पोहोच करणे तसेच सदर अन्नाचे विद्यार्थ्यांना वाटप करणे त्याप्रमाणे दि.०२/०२/२०११ च्या शासन निर्णयामध्ये स्वयंपाकी तथा मदतनीसाच्या कामासाठी विहित केलेल्या जबाबदाऱ्या संस्थेच्या राहतील.

६.७ शालेय पोषण आहार योजनेअंर्तगत आहार पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेले अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबत सर्व अधिकार संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त यांना राहतील.

६.८ शालेय पोषण आहार योजनेअतंर्गतशिजवलेला आहार पुरवठा करण्यासंदर्भात संस्थेबरोबर करावयाचा करारनामा / Memorandum of Understanding हा ०१ वर्षासाठी करण्यात येईल.

६.९ संस्थेस नेमून देण्यात येणारी बालवाडीतील विद्यार्थी संख्या यामध्ये बदल करावयाचा असल्यास आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार महानगरपालिकेचे आयुक्त यांना राहतील, तसेच स्वयंपाकगृह संस्थेच्या स्वयंपाकगृह/गोदामाच्याग्रहाची जागा स्वच्छता व इतर बाबींसाठी अयोग्य आढळ्यास महापालिका आयुक्तांनी निर्देश दिल्यास ठिकाणांमध्ये बदल करणे आवश्यक राहील

६.१० स्वयंपाकगृह संस्थेने दरमहा किमान एकदा तयार आहाराची तपासणी शासकीय. अथवा एनएबीएल प्रमाणित प्रयोगशाळेकडून करून घेणे बंधनकारक आहे. स्वयंपाकगृह संस्थेमधील तयार आहाराचा नमूना ज्या दिवशी ज्या संस्था / बालवाडीमधूनउचलावयाचा आहे. त्यांची निवड संबंधित महानगरपालिका यांनी करावी तयार आहाराची प्रयोगशाळा तपासणी करण्यासाठी आवश्यक तो खर्च स्वयंपाकगृहबचतगट/ संस्थेने स्वखर्चातून करणे बंधनकारकराहील.

६.११ आहाराचा पुरवठा करताना संस्थेस कोणतेही कर दयावे लागल्यास त्याचा भरणा संस्थेने स्वतः करणे आवश्यक राहील. तसेच तयार आहाराच्या वाहतूकीच्या दरम्यान अपघात झाल्यास अपघातग्रस्तास भरपाई देण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

६.१२ स्वयंपाकगृह संस्थेने आहार पुरवठ्याच्या कामाचे बालवाडीनिहाय मासिक अहवाल महानगरपालिका यांना वेळोवळी सादर करणे बंधनकारकराहील. संस्थेने केलेल्या आहार पुरवठयाचे देयक यांचे स्तरावरुन थेटपणे स्वयंपाक गृहबचतगट/ संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा केले जाईल. काही तांत्रिक अडचणी व अपरिहार्य कारणामुळे देयकाच्या अदायगीस विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही. ही अट अर्ज सादर करताना संस्थेस मान्य करणे आवश्यक आहे.

६.१३ आहार पुरवठ्याचे काम पुरवठादार संस्थेस स्वतः करावे लागेल. त्यांकरीता उपकंत्राटदार नेमता येणार नाही. संस्था त्यांना नेमून दिलेले काम उपपुरवठादार नेमून करत असल्याचे आढळून आल्यास संस्थेस देण्यात आलेला कामाचा ठेका रद्द करण्यात येईल.

६.१४ आहार शिजवण्यासाठी हळद, मिरची पावडर, कांदा-लसून मसाला व गरम मसाला हया ब्रेडेडअँगमार्क दर्जाचे वापरणे अनिवार्य राहील. तसेच सोयाबीन खादयतेल आयोडीनयुक्त मीठ वापरणे अनिवार्य राहील,

६.१५ शासनाने निश्चित केलेल्या पाककृती प्रमाणे व ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे तयार आहाराची वाहतूक ही हवाबंद डब्यातून व बंदिस्त वाहनातून शाळेपर्यंतस्वयंपाकगृह संस्थेस करणे बंधनकारकराहील.

६.१६ स्वयंपाकगृहसंस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहाराची चव संबंधित बालवाडीकडून घेण्यात येईल. त्यानंतर त्या आहाराचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल. आहार खाण्यास अयोग्य असल्यास तो स्विकारला जाणार नाही.

६.१७ रु.५००/-, निकृष्ट दर्जाचा आहार पुरविल्यामुळे / रु.२००/-उशिरा आहार पुरविल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव स्वयंपाकगृह संस्थेस दंड आकारण्यात आल्यास, दंडाच्या रकमेची वसूली प्रथम त्यांच्या देयकामधून करण्यात येईल व दंडाची रक्कम देयकापेक्षा अधिक झाल्यास त्यांचीवसूलीसुरक्षाअनामत रकमेतून करण्यात येईल.

६.१८ आहार पुरवठ्याबाबत कोणतीही गैर घटना घडल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जवाबदार राहील. तसेच संस्थेने पुरवठा केलेल्या आहारामुळे विषबाधेची घटना घडल्यास अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अतंर्गत नियमानुसार संस्था कारवाईस पात्र ठरेल.

६.१९ संस्था आहार पुरवठा करण्याचे काम करण्यात अथवा अटी शर्तींचे पालन करण्यात असमर्थ / अयशस्वी ठरल्यास त्यांचे काम कोणत्याही प्रकारची लेखी स्वरुपात पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा त्या कामाकरीता अन्य पुरवठादार संस्था नियुक्त करण्याचा अधिकार संबंधित आयुक्त महानगरपालिका यांचा राहील.

६.२० स्वयंपाकगृहाचे स्थळ / ठिकाण अर्जामध्ये कळविल्याप्रमाणे त्याच ठिकाणी असणे आवश्यक आहे. गोडावून / स्वयंपाकगृह यांची तपासणी वेळोवेळी स्थानिक स्वराज्य संस्थामार्फतकरण्यांत येईल.

६.२१ स्वयंपाक गृहसंस्थे मार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहारात तपासणीमध्ये प्रथिने व उष्मांकविहीत परिमाणापेक्षा कमी आढळून आल्यास त्या दिवशी त्या संस्थेने पुरवठा केलेल्या सर्व बालवाडीतील आहाराची देयके अदा केली जाणार नाही. तथापि, सतत ३ वेळा पेक्षा जास्त वेळा आहारातील प्रथिने व उष्मांकाचे प्रमाण कमी आढळून आल्यास अशा स्वयंपाकगृह संस्थेचे काम कोणतीही पूर्व सूचना न देता पूर्णपणे रद्द करण्याचे व स्वयंपाकगृह संस्थेला काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

६.२२ पुरवठा करण्यात आलेल्या आहारामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्यास, संबंधित स्वयंपाक गृहसंस्थेविरुद्ध योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात येईल त्याचप्रमाणे संस्थेने त्या दिवशी आहार पुरवठा केलेली सर्व बालवाड्यामधील सर्व विद्यार्थ्यांसाठीची देयके अदा करण्यात येणार नाहीत. विषबाधा झालेल्या तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन स्वयंपाकगृह संस्थेस सर्व वैद्यकीय खर्च करावा लागेल. जिवीतहानी/गंभीर स्वरुपाची हानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी स्वयंपाकगृह संस्थेची राहील. अशा संस्थेचे काम कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

६.२३ स्वयंपाकगृहसंस्थेमार्फत पुरविण्यात येणारा आहार ज्या दिवशी भेसळयुक्त असल्याचे आढळून येईल त्या दिवशी संबंधित संस्थेकडून पुरवठा केलेल्या सर्वबालवाड्यांच्या आहाराची देयके अदा करण्यात येणार नाहीत. आहारामध्ये भेसळ आढळून आल्यास अन्न व भेसळ प्रतिबंध कायद्याखाली संबंधित संस्था कारवाईस पात्र राहील.

६.२४ स्वयंपाकगृह संस्थेला खालील नमूद कारणांकरिता त्या दिवसाचे देयक अदा न करण्याचा अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना राहतील.

१. विषबाधा झाल्यास
२. प्रयोगशाळा तपासणी अहवालामध्ये नमूने असमाधानकारक आढळल्यास
३. धान्यामध्ये भेसळ आढळल्यास
४. धान्य निकृष्ट दर्जाचे आढळल्यास

६.२५ पहिले बिल सादर करण्यापूर्वी अग्निसुरक्षा लेखापरीक्षण (Fire Audit) आणि सुरक्षा उपाययोजनांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील

६.२६ विद्यार्थी संख्या, त्यानुसार गोडावून व स्वयंपाक गृहासाठी आवश्यक जागा, आर्थिक उलाढाल इत्यादी बाबी निश्चित केल्या आहेत. सदर अटी व शर्ती यामध्ये स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन बदल करण्याचे अधिकार संबंधित आयुक्त महानगरपालिका यांना राहतील.

६.२७ शासन निर्णय, परिपत्रके, वित्तीय नियमावली व प्रचलित शासन नियम यानुसारस्वयंपाकगृह संस्थेस कामकाज पार पाडणे बंधनकारक आहे. तसेच योजनेच्या

प्रभावी केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी केले जाणारे बदल / नियमावली सर्व संस्थांना लागू राहतील.

७ **फॉर्म शुल्क आणि अनामत व सुरक्षा ठेव** :

७.१ EOI करीता संस्थेने करावयाच्या अर्जाची फार्म फी/किंमत महानगरपालिका करिता रु.१०००/- इतकी राहील. ती ना परतावा असेल. महानगरपालिका निधीत जमा केले जातील / डिमांड ड्राफ्ट द्वारे भरले जातील.

७.२ अनामत ठेव (EMD) : रु.२८०००/- विहित नमुन्यातील EOI दस्त एवजासह महानगरपालिकेकडे जमा केले जातील. EMD अयशस्वी बोलीदाराला EOI च्या अटी व शर्तीनुसार परत करण्या योग्य असेल. यशस्वी बोलीदाराच्या बाबतीत, कराराच्या अटी नुसार EMD हाताळले जाईल./ समायोजित केले जाईल.बिडर ने आपली ऑफर मागे घेतल्यास किंवा EOI च्या अटी व शर्तीचे पालन करण्यास अयशस्वी झाल्यास EMD जप्त करण्यास जबाबदार असेल.

७.३ **सुरक्षा ठेव :** संस्थेस कार्यादेश देण्यापूर्वी ३% सुरक्षा ठेव रु.१,०८,०००/- डी.डी स्वरुपात जमा करावी लागेल देय असलेल्या ,मासिक देयकातून ७% इतकी सुरक्षा ठेव कपात करण्यात येईल करार कालावधी पूर्ण झाल्या नंतर ६ महिन्यांनी सदर रक्कम संस्थेस परत करण्यतात येईल करार कालावधीत संस्थेने कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास किंवा संस्थेने केलेल्या कामात त्रुटी आढळल्यास लागू वसुली / दंड सुरक्षा ठेवीतून समयोजित / वसूल करण्यात येईल

८ **अधिकार क्षेत्र :**

कराराशी सबंधित एजन्सी आणि महानगरपालिका यांच्यातील कोणताही कायदेशीर विवाद जिल्हा व सत्र न्यायालय जळगाव यांच्या अधिकार क्षेत्रात असेल. मा.उच्च न्यायालया समोरील कार्यवाहीसाठी, अधिकार क्षेत्र औरंगाबाद खंड पीठाचे असेल., स्त्रोत दस्तएवजात नमूद केल्या प्रमाणे .

.....

मक्तेदार/पुरवठादाराची सही

आयुक्त

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव